

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०६ | अंक : ९५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.१७ नोव्हेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

सरकारकडून प्रत्येक ग्रामपंचायतीला १५ लाखांचा निधी

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.१६, नागपूर : राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी सरकारने व्यापक कृती आराखडा तयार केला असून, त्याच्या अंम लबजावणीसाठी ११ महत्त्वाच्या विभागांना जबाबदारी सोपविण्यात आली आहे. चारा संवर्धनापासून जलसंधारणापर्यंत सुमारे ४५ ते ४६ निर्णयांच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त भागांना दिलासा देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. याअंतर्गत प्रत्येक ग्रामपंचायतीला जिल्हा नियोजन समि तीच्या (डीपीसी) माध्यमातून १५ लाख रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. तसेच कोळसा आणि मँगनीज खाणींम धून बाहेर पडणारे पाणी नदी-नाल्यांम ध्ये सोडण्याऐवजी ते शेतकऱ्यांच्या उपयोगात आणण्याची योजना सरकार आखत आहे. नागपूरचे पालकमंत्री आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबत माहिती दिली.



राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी विविध विभागांच्या योजनांमध्ये आवश्यक बदल करण्यात येत आहेत. डीपीसीच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या योजनांमध्येही म ोठ्या प्रमाणात फेरबदल करण्यात आले आहेत. अनावश्यक कामांना फाटा देऊन दुष्काळ निवारणासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांना प्राधान्य देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

यामुळे उपलब्ध निधीचा उपयोग थेट दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांना आणि शेतकऱ्यांना होणार आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीला १५ लाख रुपये देऊन त्या गावाचा स्वतंत्र जलसंधारण आणि ग्रामविकास आराखडा तयार करण्यात येणार आहे. पशुसंवर्धन, मत्स्य व्यवसाय, जलसंधारण, महसूल यासह एकूण ११ विभागांनी या कामात आपली जबाबदारी स्वीकारली आहे. गावाच्या गरजेनुसार पाणी साठवण, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, चारा उपलब्धता आणि शेतीशी संबंधित उपाययोजनांवर भर दिला जाणार असल्याची माहिती बावनकुळे यांनी दिली.

खाणींतील पाणी शेतीसाठी वापरणार...

दुष्काळी भागातील पाण्याची सम स्या सोडविण्यासाठी कोळसा आणि मँगनीज खाणींमधून बाहेर पडणाऱ्या पाण्याचा वापर करण्याची महत्त्वपूर्ण योजना आखली जात आहे. वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (डब्ल्यूसीएल) आणि मँगनीज ओर इंडिया लिमिटेड (मॉइल) यांच्या खाणींमध्ये खनिज उत्खननाच्या प्रक्रियेदरम्यान मोठ्या प्रमाणात पाणी बाहेर काढले जाते. हे पाणी सध्या नदी-नाल्यांमध्ये सोडले जाते. मात्र, त्याचा उपयोग शेतीसाठी कसा करता येईल, याबाबत सरकार पातळीवर बैठक घेण्यात येत आहे. हे पाणी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याची व्यवहार्यता तपासून त्यादृष्टीने नियोजन केले जाणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

१५ लाख शेतकऱ्यांना फार्मर आयडीचा लाभ

दरम्यान, आदिवासी वनपट्टाधारकांना मालकी हक्क आणि शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याच्या दृष्टीनेही म हत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील ११ जिल्ह्यांमधील ३५ विधानसभा मतदारसंघांतील आदिवासी बांधवांना प्रॉपर्टी कार्डचा लाभ मिळणार आहे. यामुळे संबंधित शेतकऱ्यांना फार्मर आयडी आणि ॲग्रीस्टॅक नोंदणीसह पीक विमा, किसान सन्मान योजना तसेच केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध कृषी योजनांचा लाभ घेता येणार आहे.

ज्या शेतकऱ्यांकडे जमिनीच्या मालकीसंदर्भात कोणतीही कागदपत्रे नाहीत; मात्र ते प्रत्यक्षात जमीन कसत आहेत, अशा शेतकऱ्यांनाही दिलासा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. १ जानेवारी २०१५ पूर्वीपासून जमीन कसणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना फार्मर आयडी देण्यात येणार आहे. राज्यातील सुमारे १५ लाख शेतकऱ्यांकडे फार्मर आयडी नसल्याने त्यांना या निर्णयाचा फायदा होणार असल्याचे ते म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महसूल विभागाची जबाबदारी दिल्याम ुळे आदिवासी शेतकऱ्यांना जमिनीचे मालकत्व मिळवून देण्याचे काम करता आले, याचा आनंद असल्याची भावना बावनकुळे यांनी व्यक्त केली. आदिवासी शेतकऱ्यांना मालकी हक्कासोबतच शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

१५ लाख शेतकऱ्यांना फार्मर आयडीचा लाभ

जंगल सफारीच्या नावाखाली पर्यटकांची फसवणूक

अक्षराज : वसंत वडस्कर

दि.१६, बल्लारपूर (चंद्रपूर) : मध्य चांदा वनविभागांतर्गत बल्लारशाह वनपरिक्षेत्रातील कारवा-बल्लारशाह जंगल सफारीच्या नावाखाली पर्यटकांची फसवणूक होत असल्याचे समोर आले आहे. सफारीचे ऑनलाइन बुकिंग करून देण्याचे आमिष दाखवून सायबर भामटे आणि दलाल पर्यटकांना जाळ्यात ओढत असल्याने वनविभागाने पर्यटकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.



कारवा – बल्लारशाह जंगल सफारीला २०२१ पासून सुरुवात झाली आहे. या सफारीदरम्यान हमखास व्याघ्रदर्शन होत असल्याने अल्पावधीतच ही सफारी देशभरात प्रसिद्ध झाली आहे. त्यामुळे महाराष्ट्रासह परराज्यातील तसेच परदेशातील पर्यटकही मोठ्या संख्येने या सफारीला भेट देत असतात.

पर्यटकांची वाढती संख्या आणि सफारीची लोकप्रियता लक्षात घेऊन काही सायबर भामटे व दलालांनी याचा गैरफायदा घेण्यास सुरुवात केली आहे. सफारीचे बुकिंग मिळवून देण्याचे आश्वासन देत पर्यटकांची आर्थिक फसवणूक केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे.

विशेष म्हणजे, कारवा – बल्लारशाह जंगल सफारीचे बुकिंग करण्यासाठी कोणतीही ऑनलाइन सुविधा उपलब्ध नाही. सफारीचे बुकिंग केवळ सफारी गेट, कारवा येथे प्रत्यक्ष उपस्थित राहून ऑफलाइन पद्धतीने काउंटरवरच स्वीकारले जाते. त्यामुळे ऑनलाइन बुकिंगच्या नावाखाली पैसे मागणाऱ्या व्यक्तींपासून पर्यटकांनी सावध राहावे आणि कोणत्याही अनोळखी व्यक्तीला पैसे देऊ नयेत, असे आवाहन बल्लारशाहचे वनपरिक्षेत्र अधिकारी राजेंद्र दा. घोरुडे यांनी केले आहे.

पाणी चोरी करणाऱ्यांची खैर नाही! जिल्हाधिकाऱ्यांचे कठोर कारवाईचे आदेश!

अक्षराज : आदित्य चिकटे

दि.१६, लातूर : लातूर शहरातील पाणीपुरवठा व्यवस्था अधिक सक्षम, नियमित आणि पारदर्शक करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या अध्यक्षतेखाली विशेष आढावा बैठक पार पडली. या बैठकीत अनधिकृत नळ जोडण्या, पाण्याचा अपव्यय आणि मुख्य जलवाहिनीवरून म ोटार लावून पाणी उपसा करण्याच्या प्रकारांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले.

या बैठकीस मनपा आयुक्त राहुल कुलकर्णी, अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, पाटबंधारे विभागाच्या अधीक्षक अभियंता रुपाली ठोंबरे, उपायुक्त पंजाबराव खानसोळे, महावितरण व एम आयडीसीचे अधिकारी तसेच महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत शहरातील पाणी वितरण व्यवस्थेचा



सविस्तर आढावा घेण्यात आला. शहरात नियोजित वेळेनुसार नियमित पाणीपुरवठा होण्यासाठी काटेकोर नियोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

संपूर्ण शहरात सर्वेक्षण करून अनधिकृत नळ जोडण्यांची ठिकाणे, प्रकार आणि संबंधित मालमत्तांची माहिती संकलित करण्याचे आदेश देण्यात आले. दोषी मालमत्ताधारकांवर दंडात्मक व प्रशासकीय कारवाई करण्यासह आवश्यकता भासल्यास पोलीस कारवाई करण्याचेही निर्देश देण्यात आले.

मुख्य जलवाहिनीवर थेट मोटार लावून पाणी उपसा करणाऱ्या घरगुती ग्राहकांसह अपार्टमेंटची स्वतंत्र तपासणी करून कठोर कारवाई करण्यास सांगण्यात आले. तसेच शासकीय व खासगी बोअरवेल आणि इतर पाणी स्रोतांची तपासणी करण्याचे निर्देशही देण्यात आले.

दरम्यान, नियमांनुसार पात्र असलेल्या अनधिकृत नळ जोडण्या नियमित करण्याची कार्यवाही करावी, पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करावी आणि सुरू असलेल्या सर्वेक्षण मोहिमेला गती द्यावी, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

या सर्व निर्देशांची तातडीने आणि प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी संबंधित यंत्रणांना दिले.

प्रस्तावित कन्हाळगाव अभयारण्य रद्द करण्याची आ.सुधीर मुनगंटीवार यांची मागणी

अक्षराज : वसंत वडस्कर

दि.१६, चंद्रपूर : चंद्रपूर जिल्ह्यातील कन्हाळगाव अभयारण्य रद्द करण्याची मागणी माजी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन निवेदन दिलं. विशेष म्हणजे, तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी २०२० मध्ये घोषित केलेल्या या अभयारण्याला मुनगंटीवार यांनी पुन्हा एकदा विरोध दर्शवला आहे.

तसेच, या अभयारण्याच्या निर्मितीसाठी आग्रही असलेल्या मुंबईतील तथाकथित पर्यावरणवाद्यांवरही त्यांनी जोरदार टीका केली. चंद्रपूर जिल्ह्यातील सुमारे ३१ हजार हेक्टर वनक्षेत्रावर कन्हाळगाव अभयारण्य प्रस्तावित आहे. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि तत्कालीन वनमंत्री यांच्या काळात २०२० मध्ये या अभयारण्याची घोषणा करण्यात आली होती.



त्यापूर्वी २०१४ ते २०१९ या कालावधीत वनमंत्री असलेल्या सुधीर मुनगंटीवार यांनी स्थानिकांचा विरोध लक्षात घेऊन या अभयारण्याला मान्यता दिली नव्हती. आता हे अभयारण्य रद्द करण्याची मागणी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. कन्हाळगावचा परिसर ताडोबा व्याघ्र प्रकल्प आणि कावल व्याघ्र प्रकल्प यांना जोडणाऱ्या महत्त्वाच्या टायगर कॉरिडॉरचा भाग आहे. या जंगलात समृद्ध जैवविविधता असून, सध्या या परिसरात अंदाजे २२ ते ३२ वाघांचा अधिवास असल्याचं सांगितलं जातं. त्यामुळे वन्यजीव संवर्धनाच्या दृष्टीने हा परिसर महत्त्वाचा मानला जातो. मात्र, अभयारण्य घोषित झाल्यास जंगलावर अवलंबून असलेल्या स्थानिक नागरिकांच्या रोजगारावर आणि पारंपरिक हक्कांवर परिणाम होऊ शकतो, अशी भूमिका मुनगंटीवार यांनी मांडली आहे. दरम्यान, या अभयारण्याला स्थानिक पातळीवर सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींचा विरोध असतानाही मुंबईतील काही पर्यावरणवादी त्याच्या निर्मितीसाठी आग्रही असल्याचा आरोप मुनगंटीवार यांनी केला. जंगल आणि स्थानिकांच्या प्रश्नांबाबत भूमिका घेताना पर्यावरण वाद्यांकडून दुजाभाव केला जात असल्याची टीकाही त्यांनी केली. उद्योगांसाठी जंगलतोड केली जाते, त्यावेळी हेच पर्यावरणवादी तोंडाला फेविकॉल लावून गप्प बसतात, असं म्हणत त्यांनी या पर्यावरणवाद्यांवर निशाणा साधला.

दीड लाखांचं कर्ज अन् शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू!

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.१६, नांदेड : फायनान्स कार्यालयात एका शेतकऱ्याचा मृतदेह आढळल्याची घटना राज्यभर चर्चे त असतानाच नांदेडमध्ये एका शेतकऱ्याने जीवन संपवल्याची घटना समोर आली आहे. फायनान्स कंपनीच्या कर्जवसुलीच्या तगाद्याला कंटाळून एका ५७ वर्षीय शेतकऱ्याने रविवारी रेल्वेखाली येऊन जीवन संपवल्याचा आरोप केला जात आहे. नांदेड जिल्ह्यातील उमरी तालुक्यातील बोळसा येथे ही दुर्दैवी घटना घडली आहे. या प्रकरणी नांदेड रेल्वे पोलिसांनी महिंद्रा होम फायनान्स कंपनीच्या चार कर्मचाऱ्यांविरोधात आत्म हत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.



फायनान्स कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून एक लाख रुपयांच्या थकबाकीसाठी तगादा सुरू होता, असा कुटुंबीयांचा आरोप आहे. दत्ता मोहनराव उमाटे (रा. गणपूर, ता. उमरी) असे मयत शेतकऱ्याचे नाव आहे. दरम्यान फायनान्स कंपनीच्या मुजोरपणा विरोधात संताप व्यक्त केला जात आहे.

नेमकं प्रकरण काय? : दत्ता उमाटे हे अल्पभूधारक शेतकरी होते. २०१८ मध्ये घराच्या बांधकामासाठी त्यांनी महिंद्रा होम फायनान्स कंपनीच्या नांदेड शाखेतून दीड लाख रुपये कर्ज घेतले होते. शेतकऱ्याकडून नियमितपणे वार्षिक परतफेड सुरू होती, असा दावा कुटुंबीयांनी केला आहे. मात्र, उर्वरित एक लाख रुपये कर्जाच्या वसुलीसाठी फायनान्स कंपनीचे कर्मचारी वारंवार तगादा लावत होते, असा आरोप कुटुंबीयांनी केला आहे.

१७ ऑक्टोबर रोजी वसुलीसाठी घरी आलेल्या कंपनीच्या कर्मचाऱ्यांसोबत दत्ता उमाटे आणि त्यांच्या नातेवाईकांचा वाद झाला होता. या प्रकरणी महिंद्रा होम फायनान्सच्या कर्मचाऱ्यांनी उमरी पोलिसांत शेतकरी आणि कुटुंबीयांविरोधात शिवीगाळ करून मारहाण केल्याचा गुन्हा दाखल केला.

येरवड्यात विजेचा 'शॉक' जीवावर! २९ वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

अक्षराज : प्रणिल कुसाळे

दि.१६, येरवडा : जय जवाननगर येरवडा भागातील परिसरात विजेचा धक्का लागून २९ वर्षीय हरीश गौतम मोहिते या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून महावितरणच्या विद्युत यंत्रणेच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. घरातील विद्युत प्रवाहामुळे तरुणाचा जीव गेल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे, या प्रकरणात महावितरणकडून



अनधिकृत वीजजोडणी असल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, मृताच्या कुटुंबीयांनी म हावितरणच्या निष्काळजीपणावर प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यामुळे या मृत्यूला नेमके जबाबदार कोण, असा सवाल उपस्थित होत आहे. परिसरातील विद्युत वाहिन्या, जोडण्या आणि सुरक्षिततेच्या उपाययोजनांची नियमित तपासणी केली जाते का, हादेखील महत्त्वाचा प्रश्न आहे.

अनधिकृत वीजजोडणी होती तर ती वेळीच का रोखण्यात आली नाही? विद्युत यंत्रणेत त्रुटी होत्या का? नागरिकांच्या सुरक्षिततेची जबाबदारी नेमकी कोणाची? असे अनेक प्रश्न या घटनेनंतर पुढे आले आहेत. या प्रकरणात विद्युत निरीक्षकांचा अहवाल महत्त्वाचा ठरणार आहे. संबंधित यंत्रणेने निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. एका तरुणाचा जीव गेल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का, असा संतप्त सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे.



बाळासाहेब!

१७ नोव्हेंबर हा दिवस महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक इतिहासातील एका महत्त्वाच्या व्यक्तिमत्त्वाच्या स्मृती जागवणारा दिवस आहे. याच दिवशी २०१२ मध्ये शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे निधन झाले. मराठी माणसाच्या हक्कांसाठी आवाज उठवणारे, आपल्या आक्रमक वक्तृत्वाने लाखो लोकांना प्रभावित करणारे आणि व्यंगचित्रांच्या माध्यमातून सामाजिक व राजकीय परिस्थितीवर भाष्य करणारे बाळासाहेब आज आपल्यात नाहीत. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या कार्याचा आणि व्यक्तिमत्त्वाचा आढावा घेणे उचित ठरेल. बाळासाहेब ठाकरे यांचा जन्म २३ जानेवारी १९२६ रोजी पुणे येथे झाला. त्यांचे वडील प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे हे थोर समाजसुधारक, विचारवंत आणि लेखक होते. वडिलांकडूनच बाळासाहेबांना सामाजिक कार्याचे आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याचे बाळकडू मिळाले. प्रबोधनकारांचे पुरोगामी विचार, स्पष्टवक्तेपणा आणि आक्रम क वृत्ती यांचा प्रभाव बाळासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वावर पडला. बाळासाहेबांनी आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात एक व्यंगचित्रकार म्हणून केली. १९५० च्या दशकात त्यांनी फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून काम केले. आपल्या कुंचल्याच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक, राजकीय आणि सार्वजनिक प्रश्नांवर मार्मिक भाष्य केले. याच काळात त्यांचा प्रसिद्ध व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण यांच्याशी परिचय झाला. पुढे बाळासाहेबांनी व्यंगचित्रकलेत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. मराठी माणसांच्या प्रश्नांना व्यासपीठ मिळावे आणि त्यांच्या हक्कांविषयी जनजागृती व्हावी, या उद्देशाने बाळासाहेबांनी १३ ऑगस्ट १९६० रोजी 'मार्मिक' या साप्ताहिकाची सुरुवात केली. या साप्ताहिकाच्या माध्यम ातून त्यांनी मुंबईतील मराठी माणसांच्या रोजगाराचा प्रश्न, त्यांच्यावर होणारा अन्याय आणि मराठी माणसांची होत असलेली उपेक्षा यावर आवाज उठवला. मार्मिकमधील व्यंगचित्रे आणि लेखांमुळे मराठी तरुणांमध्ये स्वाभिमानाची भावना जागृत होऊ लागली. केवळ व्यंगचित्रे आणि लेखन करून मराठी माणसांचे प्रश्न सुटणार नाहीत, तर त्यासाठी संघटित शक्ती निर्माण करावी लागेल, असा विचार बाळासाहेबांच्या मनात आला. त्यातूनच १९ जून १९६६ रोजी शिवसेनेची स्थापना झाली. शिवसेनेच्या माध्यमातून म राठी माणसांच्या हक्कांसाठी संघटित लढा उभारण्यास सुरुवात झाली. अल्पावधीतच या संघटनेचा विस्तार मुंबईपासून म हाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यापर्यंत झाला. ३० ऑक्टोबर १९६६ रोजी मुंबईतील शिवाजी पार्क येथे शिवसेनेचा पहिला मोठा जाहीर मेळावा झाला. या मेळाव्याला मोठ्या संख्येने मराठी तरुण उपस्थित होते. बाळासाहेबांच्या प्रभावी वक्तृत्वाने आणि विचारांनी अनेक तरुण शिवसेनेकडे आकर्षित झाले. शिवाजी पार्क आणि बाळासाहेबांचे भाषण हे पुढे महाराष्ट्राच्या राजकीय जीवनातील एक महत्त्वाचे समीकरण बनले. बाळासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची लेखणी. त्यांनी सुरू केलेल्या 'साम ना' या दैनिकातून त्यांनी राजकीय आणि सामाजिक प्रश्नांवर परखड भाष्य केले. सामनातील त्यांचे अग्रलेख वाचण्यासाठी अनेक वाचक उत्सुक असत. त्यांची लेखनशैली स्पष्ट, परखड आणि आक्रमक होती. त्यांच्या भाषणांप्रमाणेच त्यांच्या लेखणीचाही महाराष्ट्राच्या राजकारणावर प्रभाव पडला.

१९९५ मध्ये महाराष्ट्रात शिवसेना-भाजप युतीचे सरकार सत्तेवर आले आणि मनोहर जोशी मुख्यमंत्री झाले. या सत्तांतरात बाळासाहेब ठाकरे यांची भूमिका महत्त्वाची होती. या सरकारच्या काळात झुणका-भाकर योजना, मुंबईतील उड्डाणपूल, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाच्या कामाला गती, झोपडपट्टीवासीयांसाठी घरांची योजना आणि मुंबईचे नामांतर अशा विविध विषयांवर निर्णय आणि उपक्रम राबविण्यात आले. महाराष्ट्राच्या राजकारणात बाळासाहेबांनी निर्माण केलेले स्थान या काळात अधिक ठळकपणे दिसून आले.

बाळासाहेबांचे व्यक्तिमत्त्व अनेक पैलूंनी समृद्ध होते. ते उत्तम व्यंगचित्रकार, प्रभावी वक्ते, परखड लेखक आणि संघटनकौशल्य असलेले राजकीय नेते होते. मराठी भाषा, मराठी संस्कृती आणि मराठी माणसांच्या अस्मितेचा विषय त्यांनी सातत्याने मांडला. त्यांच्या विचारांशी अनेकजण सहमत होते, तर त्यांच्या काही भूमिका आणि वक्तव्यांवर मतभेदही व्यक्त केले जात होते. मात्र महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासावर त्यांनी उमटवलेला ठसा नाकारता येणार नाही.

१७ नोव्हेंबर २०१२ रोजी बाळासाहेब ठाकरे यांचे निधन झाले आणि महाराष्ट्राच्या राजकीय जीवनातील एका पर्वाचा अंत झाला. त्यांच्या निधनानंतरही त्यांच्या भाषणांची, व्यंगचित्रांची आणि लेखनाची चर्चा होत असते. मराठी म ाणसांच्या मनात स्वाभिमानाची भावना जागृत करण्यासाठी त्यांनी केलेले कार्य त्यांच्या समर्थकांच्या स्मरणात कायम राहील.

- श्याम ठाणेदार

८,५०० पुस्तके... आता माणसे आणि विचार जोडण्याची वेळ!

पुस्तकांच्या संकलनापासून आयुष्यभर शिकण्याच्या संस्कृतीपर्यंत; एका छोट्या कृतीतून मोठ्या सामाजिक बदलाची सुरुवात...

एखादे पुस्तक आपण विकत घेतो, वाचतो आणि नंतर कधीतरी कपाटात ठेवून देतो. त्यातील विचार आपल्या आयुष्याचा भाग बनतात; काही अनुभव आपल्याला नवी दिशा देतात, तर काही प्रश्न विचार करण्याची दृष्टी बदलतात. पण त्या पुस्तकाचा प्रवास तिथेच थांबायला हवा का? ज्या पुस्तकाने आपल्याला काहीतरी शिकवले, तेच पुस्तक दुसऱ्या एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यात नवे विचार, नवी दिशा आणि नव्या शक्यता निर्माण करू शकत नाही का?

याच एका साध्या विचारातून नवरात्री रिसोर्स रिव्हायव्हल या उपक्रमाची सुरुवात झाली. अनेक कुटुंबांनी आपल्याकडील पुस्तके पुढील वाचकासाठी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला. नागरिकांच्या सहभागातून आजपर्यंत ८,५०० पुस्तके जमा झाली आहेत. ही केवळ पुस्तकांची संख्या नाही; ती अनेक कुटुंबांनी दाखवलेल्या विश्वासाची, सामाजिक जबाबदारीची आणि ज्ञान वाटून घेण्याच्या इच्छेची साक्ष आहे. एका व्यक्तीने वाचलेले पुस्तक दुसऱ्या व्यक्तीच्या हातात देणे, ही कृती साधी वाटू शकते; परंतु तिच्यामागे संसाधनांचा आदर, दुसऱ्याच्या शिकण्याची काळजी आणि समाजाशी जोडले जाण्याची भावना दडलेली आहे.

या प्रवासात ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रणजित यादव (खअड) यांनी आपल्या व्यस्त प्रशासकीय वेळापत्रकातून वेळ काढून दिलेला पाठिंबा आणि प्रत्यक्ष सहभाग माझ्यासाठी विशेष प्रेरणादायी ठरला. दिवाळीसारख्या सणाच्या काळातही त्यांनी या उपक्रमासाठी वेळ दिला, ही बाब मी विशेष कृतज्ञतेने नमूद करू इच्छितो. प्रशासकीय जबाबदाऱ्यांमध्ये व्यस्त असतानाही नागरिकांच्या विधायक पुढाकाराला प्रोत्साहन देण्यासाठी वेळ देणे, ही संवेदनशीलता सामाजिक काम करणाऱ्या व्यक्तीला नवी ऊर्जा देते. तसेच, ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या सहकार्यामुळे ठाणे जिल्ह्यातील ३५ पोलीस ठाण्यांपर्यंत या उपक्रमाची माहिती पोहोचविण्याची संधी मिळाली. संबंधित पोलीस ठाण्यांनीही आपल्या कार्यक्षेत्रातील नागरिक आणि समुदायांपर्यंत हा संदेश पोहोचविण्यासाठी पुढाकार घेतला. पोलीस यंत्रणेचा नागरिकांशी असलेला थेट संपर्क अशा विधायक सामाजिक उपक्रम ांसाठी किती महत्त्वाचा ठरू शकतो, याचा अनुभव या प्रक्रियेतून आला. सहभागी पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचेही मी मनःपूर्वक आभार मानतो. या सहकार्याचा उल्लेख मी कोणत्याही संस्थेच्या वतीने नव्हे, तर या उपक्रमाची सुरुवात करणारा एक नागरिक म्हणून वैयक्तिक कृतज्ञतेने करीत आहे. मात्र, माझ्या दृष्टीने हा प्रवास पुस्तकांच्या संकलनावर किंवा पुनर्वितरणावर थांबणारा नाही. हा माणसांच्या विचार करण्याच्या, शिकण्याच्या आणि एकमेकांशी जोडले जाण्याच्या पद्धतीत सकारात्मक बदल घडविण्याचा प्रयत्न आहे. एखादे पुस्तक दान करणे ही सुरुवात असू शकते; पण त्यातून दुसऱ्याला शिकण्याची संधी देणे, स्वतः नवे काही शिकण्याची तयारी ठेवणे आणि समाजाच्या ज्ञानसंपदेत आपला वाटा उचलणे, हीच या उपक्रमाची खरी दिशा आहे.

वर्गीकरण नव्हे, विद्यार्थ्यांसाठी ज्ञानशोधाची संधी!

आता आपल्यासमोरचा पुढचा प्रश्न आहे : या ८,५०० पुस्तकांचे पुढे काय करायचे? पुस्तकांचे विषयानुसार, वयोगटानुसार आणि उपयोगानुसार वर्गीकरण करून ती योग्य वाचकांपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहेच. मात्र, ही प्रक्रिया केवळ वर्गीकरण आणि वितरणापुरती मर्यादित ठेवायची नाही. त्यातून विद्यार्थ्यांसाठी प्रत्यक्ष शिकण्याची आणि शोध घेण्याची संधी निर्माण करायची आहे. समजा, एखाद्या विद्यार्थ्याच्या हातात एक पुस्तक दिले. त्याला



फक्त त्यातील मजकूर वाचायला सांगण्याऐवजी त्या पुस्तकाचा सखोल शोध घेण्यास प्रोत्साहित केले, तर कितीतरी प्रश्न निर्माण होऊ शकतात. पुस्तकाचा आकार किती आहे? त्यासाठी कोणता कागद वापरला आहे? अक्षरांची रचना कशी केली आहे? चित्रे कोणी तयार केली असतील? मुखपृष्ठ कोणत्या विचारातून बनवले असेल? लेखक कोण, प्रकाशक कोण आणि पुस्तकाचा उद्देश काय? हस्तलिखितापासून संपादन, मांडणी, छपाई, बांधणी, प्रकाशन आणि वाचकापर्यंत पोहोचण्यापर्यंत किती लोकांचे योगदान असेल? अशा प्रश्नांतून विद्यार्थ्यांना भाषा, साहित्य, कला, विज्ञान, तंत्रज्ञान, मुद्रण, व्यवसाय, पर्यावरण आणि मानवी श्रम यांची ओळख होऊ शकते. पुस्तक हे केवळ वाचनाचे साधन न राहता अनेक विषयांच्या अभ्यासाची सुरुवात बनू शकते. महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थ्यांना तयार उत्तरे देण्याऐवजी स्वतः प्रश्न विचारण्याची आणि उत्तरे शोधण्याची सवय लावता येईल.

एका पुस्तकाकडे अनेक व्यक्ती वेगवेगळ्या नजरेने पाहू शकतात!

एखाद्या पुस्तकाकडे प्राथमिक शिक्षक शैक्षणिक मूल्याच्या दृष्टीने पाहतील. लेखक त्यातील आशय, मांडणी आणि अभिव्यक्तीचा विचार करतील. प्रकाशक वाचकांची गरज, संपादन आणि पुस्तकाची रचना समजावून सांगतील. मुद्रक छपाईतील तंत्रज्ञान आणि साहित्याची माहिती देतील. पर्यावरण अभ्यासक कागद, शाई, संसाधनांचा वापर आणि पुस्तकाच्या पुनर्वापराचा विचार करतील. विद्यार्थी मात्र या सर्वांकडून वेगवेगळे प्रश्न विचारतील.

याच ठिकाणी या उपक्रमाचे वेगळेपण आहे. प्रत्येक व्यक्तीला एकाच विषयाचा तज्ज्ञ बनविणे हा उद्देश नाही; तर प्रत्येकाला आपले ज्ञान दुसऱ्याशी वाटून घेण्याची आणि दुसऱ्याकडून काहीतरी शिकण्याची संधी देणे हा उद्देश आहे. अंगणवाडीतील बालकांपासून प्राथमिक, माध्यमिक आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांना सहभागी होता येईल. शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ, लेखक, कवी, वाचक, प्रकाशक, मुद्रक, ग्रंथपाल, संशोधक, पर्यावरणतज्ज्ञ, हवामान बदल आणि शाश्वत विकास क्षेत्रातील अभ्यासक, पालक, निवृत्त अधिकारी आणि विविध क्षेत्रांतील अनुभवी नागरिक यांच्यासाठीही योगदान देण्याची संधी आहे.

डिजिटल युगात पुस्तकांचे महत्त्व आणि शिकण्याची नवी पद्धत

आज डिजिटल माध्यमांमुळे माहिती सहज उपलब्ध आहे. मग पुस्तके का, असा प्रश्न रास्त आहे. मात्र, माहिती उपलब्ध असणे आणि तिचा शोध घेणे, आकलन करणे, पडताळणी करणे, वेगवेगळ्या विचारांची तुलना करणे आणि स्वतःचे मत तयार करणे या वेगळ्या गोष्टी आहेत.

पुस्तके आणि डिजिटल तंत्रज्ञान ही एकमेकांची प्रतिस्पर्धी साधने नाहीत. योग्य वापर केल्यास ती एकमेकांना पूरक ठरू शकतात. पुस्तकातून विषयाची ओळख, डिजिटल माध्यमातून अधिक माहिती, तज्ज्ञांशी संवाद आणि प्रत्यक्ष निरीक्षणातून अनुभव, अशी शिकण्याची साखळी निर्माण करता येईल. विद्यार्थ्यांना केवळ माहिती मिळविण्यापेक्षा ती कशी वापरायची, नवे प्रश्न कसे विचारायचे आणि ज्ञान कसे विकसित करायचे, याचा अनुभव मिळणे अधिक महत्त्वाचे आहे.

पर्यावरणीय जबाबदारीपासून सामाजिक वर्तनबदलापर्यंत

या उपक्रमामागे पर्यावरणीय दृष्टिकोनही आहे. प्रत्येक पुस्तकाच्या निर्मितीसाठी कागद, पाणी, ऊर्जा, छपाईचे साहित्य, वाहतूक आणि मानवी श्रम यांचा सहभाग असतो. वाचून झाल्यानंतर पुस्तक निरुपयोगी समजून बाजूला ठेवण्याऐवजी दुसऱ्या वाचकापर्यंत पोहोचविले, तर त्याचे उपयुक्त आयुष्य वाढविता येते. ही सवय पुढे शालेय साहित्य, खेळणी, कपडे आणि इतर वापरण्यायोग्य वस्तूंच्या पुनर्वापरापर्यंत पोहोचू शकते.

पुनर्वापर म्हणजे केवळ कचरा कमी करणे नव्हे; तर वस्तूंचे उपयुक्त आयुष्य वाढविणे आणि संसाधनांकडे जबाबदारीने पाहण्याची सवय विकसित करणे होय. ही दिशा गुणवत्तापूर्ण शिक्षण, जबाबदार वापर व उत्पादन, हवामान कृती आणि विविध घटकांमधील भागीदारी या संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांशी सुसंगत आहे. मात्र, अशा उपक्रमांचे खरे योगदान समजून घेण्यासाठी किती पुस्तके जमा झाली याबरोबरच किती पुस्तके पुन्हा वाचली गेली, किती नवे वाचक जोडले गेले आणि किती जणांनी पुढील सहभागाची जबाबदारी स्वीकारली, याचीही नोंद ठेवणे आवश्यक आहे.

मला घडवायचा आहे काळजी घेणारा आणि सतत शिकणारा समाज

माझ्या मनात या उपक्रमामागे एक साधा विचार आहे. अनेकदा ज्ञानाच्या अभावामुळे आपण चुका करतो. एखादी गोष्ट समजल्यावर, तिची माहिती मिळाल्यावर आणि तिचे परिणाम लक्षात आल्यावर त्याच चुका पुन्हा होण्याची शक्यता कमी करता येते. अज्ञान दूर करण्यासाठी शिकण्याची तयारी आवश्यक आहे; मात्र माहिती मिळाल्यानंतरही जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे योग्य नाही.

म्हणून मला असा समाज घडवायचा आहे, जिथे प्रत्येक व्यक्तीला शिकण्याची संधी मिळेल, प्रत्येकाच्या अनुभवाला महत्त्व दिले जाईल आणि एकमेकांच्या प्रगतीची काळजी घेतली जाईल. समान विचारांच्या लोकांनी एकत्र येणे म्हणजे प्रत्येकाचे विचार सारखे असणे नव्हे; तर वेगवेगळे विचार ऐकण्याची, मतभेद समजून घेण्याची आणि एकमेकांकडून शिकण्याची तयारी असणे होय.

एका कुटुंबाने दिलेले पुस्तक दुसऱ्या कुटुंबातील मुलाच्या हातात जाऊ शकते. एका शिक्षकाचा अनुभव विद्यार्थ्याला नवी दिशा देऊ शकतो. एखाद्या निवृत्त अधिकाऱ्याचे ज्ञान तरुणांसाठी मार्गदर्शक ठरू शकते. पर्यावरणतज्ज्ञाचा विचार सामान्य नागरिकाच्या दैनंदिन वर्तनात बदल घडवू शकतो. अशा छोट्या अनुभवांतून समाज अधिक संवेदनशील, सहकार्यशील आणि जबाबदार बनू शकतो.

आता शाळा, महाविद्यालये, ग्रंथालये, शैक्षणिक संस्था, व्यावसायिक संघटना, शासकीय कार्यालये आणि इच्छुक नागरिकांनी या पुढील प्रवासात सहभागी व्हावे. आपला वेळ, ज्ञान, अनुभव, मार्गदर्शन किंवा प्रत्यक्ष सहभाग देऊनही योगदान देता येईल. ८,५०० पुस्तके जमा होणे हा महत्त्वाचा टप्पा आहे; पण खरी यशस्विता किती पुस्तके जमा झाली यापेक्षा किती नवे वाचक तयार झाले, किती जणांनी ज्ञान वाटले आणि किती लोकांच्या वर्तनात सकारात्मक बदल घडला, यात मोजली जाईल.

आपण पुस्तके गोळा केली आहेत. आता माणसे जोडूया, विचारांची देवाणघेवाण करूया आणि शिकण्याची प्रक्रिया आयुष्यभर सुरू ठेवणारा समाज घडवूया.

- विजयकुमार कट्टी

गंगाजल

बसव महागडे एसी
हरित जंगला जाळ
ग्लोबल वॉर्मिंग शब्द
निसर्गावर का आळ

पर्यावरण परिषदेमधे
वाजे नेहमीची टाळ
कागदी भाषण वाचे
कर्तव्य आपले टाळ

गोंडस नाव प्रगतीला
बाह्य रुपावरती भाळ
दुर्भाग्य बने दुष्काळ
बडवत बसा कपाळ

थेंबा थेंबा तरसविती
कोरडे ठाक आभाळ
नामा निराळा मनुष्य
पशुपक्ष्यांची आबाळ

पाऊस पाडतो कृत्रिम
आश्वासनांस सांभाळ
पाणी तंटा जागोजागी
युध्दात हो रक्त बंबाळ

उंची वाढवा धरणांची
वाद विवाद उडे राळ
करोडो रूपये पाण्यात
दर वर्षी उपासता गाळ

– हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे - असा नेता पुन्हा होणे नाही !

जो शून्यातून विश्व निर्माण करतो, इतिहासात त्याचेच नाव सोनेरी अक्षरांनी लिहिले जाते. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे हे असेच एक अजरामर व्यक्तिमत्व. २३ जानेवारी हा त्यांचा जन्मदिन. महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबईत मराठी माणसांना अपमानास्पद वागणूक मिळत असल्याचे पाहून त्यांचे रक्त सळसळले आणि शिवसेना या संघटनेची स्थापना करून त्यांनी मराठी माणसाचे स्फ ुलिंग चेतवले. मराठ्यांना त्यांच्या न्याय हक्कासाठी लढण्यासाठी मानसिक बळ देण्याचे महत्कार्य त्यावेळी बाळासाहेबांनी केले. राज्यात मराठी आणि देशपातळीवर ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारा त्यांच्यासारखा एकही नेता ना कधी झाला ना भविष्यात कोणी होईल.

१९५० साली फ्री प्रेस जर्नल या नियतकालिकांच्या समूहामध्ये बाळासाहेब व्यंगचित्रकार म्हणून नोकरीला लागले. सामाजिक प्रश्नांना व्यंगचित्रांच्या माध्यमातून वाचा फोडण्याची त्यांची खुबी काही काळातच जनम णसांना भावू लागली. सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार आर.के. लक्ष्मण यांच्यासोबतही त्यांनी काम केले आहे, पुढे नोकरी सोडून त्यांनी १९६० मध्ये स्वतःचे मार्मिक हे साप्ताहिक सुरु केले. समाजात घडणाऱ्या घटनांवर ते व्यंगचित्रांच्या माध्यमातून भाष्य करू लागले. त्यावेळचे ते पहिले व्यंगचित्रात्मक साप्ताहिक होते. संयुक्त महाराष्ट्राची स्थापना होऊनही मुंबईत मराठी माणसांना दिली जाणारी सापत्न वागणूक त्यांना अस्वस्थ करत होती. मराठी माणसांवर होणाऱ्या अत्याचारांना त्यांनी व्यंगचित्रांच्या माध्यमातून वाचा फोडली. मराठी माणसांना त्यांच्या न्यायिक हक्कासाठी लढण्याची प्रेरणा बाळासाहेबांनी मार्मिकच्या माध्यमातून केली. अल्पावधीतच मार्मिकचा जसा खप वाढला तसा मराठी माणूस जागा होऊ लागला. महाराष्ट्रात राहून मराठी माणसाच्या हाताला रोजगार नव्हता, सामाजिक विषमतेला मराठी माणूस बळी पडत होता. मराठी माणसात अन्यायाविरुद्ध पेटून उठण्याची क्षमता आहे, मात्र त्याला कुशल नेतृत्व नसल्याने तो



विखुरला गेला आहे हे लक्षात आल्यावर १९६६ मध्ये बाळासाहेबांनी शिवसेना या मराठी अस्मितेसाठी लढा देणाऱ्या संघटनेची स्थापना केली. ३० ऑक्टोबर १९६६ या दिवशी शिवसेनेचा पहिला मेळावा शिवाजी पार्क मैदानावर पार पडला ज्याला ५ लाखाहून अधिक मराठी माणसांनी हजेरी लावली होती. तेव्हापासून बाळासाहेबांचे नाव देशभरात प्रसिद्ध झाले. १९६६ पासून आजतागायत शिवाजी पार्कचा दसरा मेळावा आणि एकनिष्ठ मराठी माणसांची गर्दी हे समीकरण अबाधित राहिले आहे. आज बाळासाहेब आपल्यात नसले तरी शिवसेनेवर प्रेम करणारे संघटनानिष्ठ शिवसैनिक आजही जनमानसांत आहेत.

राज्य स्तरावर मराठी आणि राष्ट्रीय स्तरावर हिंदुत्व हे धोरण शिवसेनेने अवलंबले. मराठी माणसांना न्याय मि ळवून देण्यासाठी राजकारणात प्रवेश करून सत्ताधाऱ्यांवर दबाव आणणे आवश्यक आहे हे ओळखून शिवसेनेने ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण हे सूत्र ठरवून राजकारणात प्रवेश केला आणि अल्पावधीतच मुंबई म हापालिकेची सत्ता हस्तगत केली. महापालिकेवर भगवा फडकला. तेव्हापासून मधला काही काळ वगळता मुंबई महापालिकेवर शिवसेनेचा भगवा सदैव डौलाने फडकत राहिला आहे. १९९५ साली भारतीय जनता पार्टीसोबत सोबत युती करून बाळासाहेबांनी मनोहर जोशींच्या रूपाने शिवसेनेचा पहिला मुख्यमंत्री राज्यावर बसवला. शिवसेनेच्या नेत्यांना लोकसभेच्या निवडणुकीत विजयी करून बाळासाहेबांनी काही खासदारही लोकसभेत पाठवले. १९८९ मध्ये बाळासाहेबांनी सामना हे शिवसेनेचे मुखपत्र म्हणून दैनिक सुरु केले.

महाराष्ट्रात राहून देशभरातील हिंदूंना त्याकाळी त्यांचा आधार होता. आज रामजन्मभूमी अयोध्येत उभे राहिलेले श्रीरामांचे भव्य मंदिर हे बाळासाहेबांचे स्वप्न होते. बाळासाहेबांच्या जयंतीच्या आदल्या दिवशी ते पूर्ण झाले. 'बाबरी मशीद जर माझ्या शिवसैनिकाने पाडली असेल, तर मला त्याचा अभिमान आहे' अशी स्पष्ट भूमिका घेऊन त्यांनी ज्वलंत हिंदुत्व म्हणजे काय असते हे हिंदुत्ववादी म्हणवून घेणाऱ्या आणि पक्षांना आणि संघटनांना त्यांनी दाखवून दिले होते. अम रनाथ यात्रा रोखू पहाणाऱ्या अतिरेक्यांना बाळासाहेबांनी म ुंबईतून ठणकावल्यानंतर अतिरेकीही वरमले होते, एव्हढा दरारा त्यांनी निर्माण केला होता. देशावर प्रेम करणारा प्रत्येक मुसलमान माझा आहे असे म्हणून त्यांनी देशप्रेमी मुसलमानांनाही संरक्षण दिले होते. कोणत्याही राजकीय पदाचा मोह न बाळगणारे बाळासाहेब मातोश्रीवर येणाऱ्या प्रत्येक पाहुण्यांशी राजकारण सोडून बोलत होते. त्याम ुळे दर्यादिल माणूस म्हणूनही त्यांची ख्याती आहे. १७ नोव्हेंबर २०१२ या दिवशी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या जाण्याने देशाच्या राजकारणात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली. कोणाचीही भीडभाड न बाळगता आपल्या तत्वांशी एकनिष्ठ राहून राजकारण करणारा असा नेता पुन्हा होणे नाही

- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई
संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

थोडक्यात बातम्या

माहिती व जनसंपर्क विभागातील सुमित राठोड यांच्यावर अंत्यसंस्कार

अक्षराज : जे. के. पोळ

दि.१६, मुंबई : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई येथे कार्यरत सहायक अधीक्षक सुमित हरिदास राठोड (वय ४५) यांचे शनिवारी विरार येथील राहत्या घरी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आज यवतमाळ येथील मोक्षधाम येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी सुमित राठोड यांच्या निवासस्थानी जाऊन पार्थिवाचे दर्शन घेतले. तसेच त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

सुमित राठोड हे मूळचे यवतमाळ जिल्ह्यातील रहिवासी होते. सन २००८ मध्ये त्यांची माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई येथे लिपिक पदावर नियुक्ती झाली होती. गेल्या १८ वर्षांपासून ते महासंचालनालयात कार्यरत होते. या कालावधीत त्यांनी विविध शाखांमध्ये जबाबदारीने आणि कुशलतेने कामकाज सांभाळले. त्यांच्या आकस्मिक निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

अंत्यसंस्कारप्रसंगी डॉ. टी.सी. राठोड, देवानंद पवार, राठोड परिवारातील सदस्य, नातेवाईक, मित्रपरिवार, मंत्रालयातील अधिकारी-कर्मचारी, जिल्हा प्रशासनातील अधिकारी आणि पत्रकार बांधव उपस्थित होते.

यावेळी माहिती व जनसंपर्क विभागाच्या वतीने धाराशिवचे जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे आणि यवतमाळचे प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी पवन राठोड यांनी पुष्पचक्र अर्पण करून दिवंगत सुमित राठोड यांना श्रद्धांजली वाहिली. तसेच त्यांच्या कुटुंबीयांना विभागाच्या वतीने आवश्यक ते सर्व सहकार्य केले जाईल, असे आश्वस्त केले.

एकाच दिवशी ५४४ सायबर तक्रारी निकाली; सायबर गुन्हेगारांना पोलिसांचा दणका

अक्षराज : वसंत वडस्कर



दि.१६, चंद्रपूर : सायबर गुन्हेगारांविरुध्द चंद्रपूर जिल्हा पोलीस दलाने आता आक्रमक पवित्रा घेतला असून, हरविलेले आणि चोरीला गेलेले मोबाईल शोधण्यासह प्रलंबित सायबर तक्रारींचा निपटारा करण्यासाठी राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत पोलिसांनी धडाकेबाज कामगिरी केली आहे. १४ नोव्हेंबर रोजी राबविण्यात आलेल्या या एकदिवसीय विशेष मोहिमेत तब्बल ५४४ सायबर तक्रारी निकाली काढण्यात आल्या, तर १४ लाख ४० हजार रुपये किमतींचे ९६ मोबाईल शोधून त्यांच्या मुळ मालकांना परत करण्यात आले. पोलिसांच्या या कारवाईमुळे सायबर गुन्हेगारांना चाप बसण्यासोबतच नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

पोलीस अधीक्षक यांच्या आदेशानुसार जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनच्या हद्दीत ही मोहिम राबविण्यात आली. ऑनलाईन फसवणूक, सायबर अत्याचार आणि मोबाईल चोरीसारख्या घटनांमुळे त्रस्त असलेल्या नागरिकांच्या तक्रारींना प्राधान्य देत पोलिसांनी विशेष कार्यवाही केली.

५४४ सायबर तक्रारींचा फडशा : अंतर्गत प्रलंबित असलेल्या ५४४ तक्रारींवर कार्यवाही करुन त्यांचा निपटारा करण्यात आला. पोर्टलवरील नोंदी अद्यावत करुन नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यावर विशेष भर देण्यात आला.

९६ मोबाईल शोधले : १४.४० लाखांचा मुद्देमाल परत ! पोर्टलच्या माध्यमातून तांत्रिक तपासाची चक्रे वेगाने फिरवत हरवलेले व चोरीला गेलेले ९६ मोबाईल शोधून हस्तगत करण्यात आले. तब्बल १४ लाख ४० हजार रुपये किंमतीचे हे मोबाईल संबंधित नागरिकांना परत करण्यात आले. मोबाईल हरवल्यानंतर तो परत मिळण्याची आशा सोडलेल्या नागरिकांसाठी ही कारवाई मोठा दिलासा ठरली.

प्रलंबित तक्रारींवरही पोलिसांचा धडाका : अंतर्गत पोर्टलवरील ४ प्रलंबित तक्रारीचे निवारण करण्यात आले. तसेच नागरिकांच्या तक्रारींचा सखोल आढावा घेत १६ मंथली रिव्ह्यू मिटींग (एमआरएम) प्रकरणे देखील एकाच दिवसात निकाली काढण्यात आली.

मोबाईल हरविल्यास किंवा चोरीला गेल्यास न घाबरता तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्याला माहिती द्यावी आणि सीईआयआर पोर्टलवर तो मोबाईल त्वरित ब्लॉक करावा, असे आवाहन चॅंद्रपूर जिल्हा पोलीस दलातर्फे करण्यात आले आहे.

कु.अक्षिता नरावाड हिची एमबीबीएस शिक्षणासाठी निवड

अक्षराज : दत्ता हमंद



दि.१६, कुंडलवाडी : बिलोली तालुक्यातील कुंडलवाडी येथील शेतकरी कुटुंबातील होतकरू तरुणी कु. अक्षिता सयाराम नरावाड हिने जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर मोठे यश संपादन केले आहे. तिची आदर्श इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स, वाडा, पालघर येथे एमबीबीएस शिक्षणासाठी निवड झाली आहे.

कु.अक्षिता ही के.रामलू शाळेची विद्यार्थिनी असून, शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका यांनी तिच्या यशाबद्दल आनंद व्यक्त केला आहे. शाळेने दिलेले संस्कार, शिस्त आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळेच हे यश मिळाल्याचे तिने यावेळी सांगितले. कु.अक्षिता हिने नुकत्याच झालेल्या नीट परीक्षेत घवघवीत यश मिळवले असून, तिच्या या यशाबद्दल कुंडलवाडी नगर परिषदेच्या नगराध्यक्ष सौ. प्रेरणाताई गजानन कोटलावार, त्यांचे प्रतिनिधी गजानन कोटलावार, सर्व नगरसेवक, नगरसेविका, सोसायटीचे चेअरमन सुनील बेजगमवार, व्हा. चेअरमन गंगाधर नरावाड आदींसह मित्रपरिवार व शिक्षकवृंदाकडून सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

मान्यवरांकडून अभिनंदन : के. रामलू शाळेचे संस्थापक अध्यक्ष सायरेड्डी ठक्कूरवार, सचिव यशवंत संगमवार, संचालिका रमा ठक्कुरवार, नरेश सब्बनवार, डॉ.नरेश बोधनकर, दत्ता हमंद - अध्यक्ष पत्रकार संरक्षण समिती, कुंडलवाडी, करण समेटवार तसेच कुंडलवाडी येथील सामाजिक, राजकीय, अध्यात्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक या सर्व स्तरातून तिचे व तिच्या परिवाराचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले.

भविष्यात ग्रामीण भागातील रुग्णांची सेवा करण्याचे ध्येय

यावेळी बोलताना कु.अक्षिता नरावाड म्हणाली, माझ्या वडिलांचे स्वप्न होते आणि माझी इच्छा होती की, आमच्या परिवारातून मी डॉक्टर व्हावे. यासाठी मी प्रयत्न केले आणि मला यश मिळाले.

पुढे बोलताना तिने सांगितले की, माझ्या यशामध्ये आई-वडील आणि काका आणि आमच्या परिवारातील सर्वांचे मोलाचे मार्गदर्शन व मोठे योगदान आहे. या सर्वांनी दिलेल्या पाठिंब्यामुळे मला हे यश संपादन करता आले. भविष्यात डॉक्टर होऊन ग्रामीण भागातील रुग्णांची सेवा करणे हे माझे ध्येय आहे. अक्षिताच्या या यशामुळे कुंडलवाडीसह परिसरात आनंदाचे वातावरण असून, तिच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

प्रशिक्षणासोबत मुक्त संवाद; कलगी-तुरा कलेच्या भविष्यावर सखोल मंथन

अक्षराज : उदय दणदणे

दि.१६, मुंबई : कलगी-तुरा समाज उन्नती मंडळ, मुंबई यांच्यावतीने आणि शांताराम भाऊ फिलसे फाउंडेशन यांच्या सौजन्याने शनिवार, दि. १४ नोव्हेंबर २०२६ रोजी दादर येथे कलगी-तुरा प्रशिक्षण शिबिर व मुक्त संवाद आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

श्री संत सेना सभागृह, दादर (प) येथे झालेल्या या कार्यक्रमाला अनेक मान्यवर, कलाकार आणि रसिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंडळाचे सरचिटणीस संतोष गोविंद धारशे यांनी केले.

कार्यक्रमाला एकनाथ सुकूम, नथुराम सोनघरे, अभय सहस्रबुद्धे, माधव कांबळे, रवींद्र मटकर, युवराज संतोष, मिलिंद चिबडे, सचिन घाणेकर आदी मान्यवर उपस्थित होते. कॅबिनेट मंत्री भरतशेठ गोगावले यांनी व्हिडीओ कॉलद्वारे शुभेच्छा दिल्या.



शिबिरात कविता, रंगबाजी आणि जाखडी नृत्य या तीन विभागात प्रशिक्षण देण्यात आले. कविता विभागात डॉ.सूर्यकांत चव्हाण, शंकर भारदे, विकास लांबोरे, रंगबाजी विभागात अनिल गावडे, अशोक पाटील, हिरु भोस्तेकर, प्रकाश पाजणे, सुधाकर म स्कर, तर जाखडी नृत्य विभागात चंद्रकांत गोताड, अनंत तांबे, अनंत येलमकर यांनी मार्गदर्शन केले.

या शिबिरातून अनुभवी कलाकारांनी आपले ज्ञान व अनुभव नव्या पिढीसमोर खुला केला. मुक्त संवादातून लोककलेची सद्यस्थिती, भविष्यातील वाटचाल आणि संवर्धनासाठीच्या उपाययोजनांवर विचारांची देवाणघेवाण झाली.

लोककलेचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प...

कलगी-तुरा ही कोकणातील समृद्ध शाहिरी लोककला असून तिचे जतन व संवर्धन करण्यासाठी या शिबिराला विशेष महत्त्व होते. नवोदितांना मार्गदर्शन व व्यासपीठ मिळावे आणि सांस्कृतिक वारसा समृद्ध व्हावा, हाच या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाच्या नियोजनासाठी अनंत तांबे, दिलीप नामे, चंद्रकांत धोपट, निलेश जोगळे, दीपक म्हादे यांनी काम पाहिले. शेवटी मंडळाचे अध्यक्ष सुरेश ऐनारकर, सरचिटणीस संतोष धारशे आणि खजिनदार सत्यवान यादव यांनी सर्वांचे आभार मानले.

कासा, खाणीवमध्ये बिरसा मुंडा जयंतीचा जल्लोष; आदिवासी परंपरा आणि अस्मितेचा जागर

अक्षराज : निलेश कासट

दि.१६, डहाणू (पालघर) : आद्य क्रांतिकारक, जननायक भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त पालघर जिल्ह्यातील ग्रामीण तसेच शहरी भागात विविध कार्यक्रमांचे आयोजन करून जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. आदिवासी समाजाचे अस्मितास्थान असलेल्या भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला अभिवादन करत त्यांच्या संघर्षमय जीवनकार्याचे स्मरण करण्यात आले. डहाणू तालुक्यातील कासा आणि खाणीव येथे पारंपरिक पद्धतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांतून आदिवासी संस्कृती, परंपरा आणि अस्मितेचे दर्शन घडले.

कासा येथील कासा उत्सव समितीच्या वतीने बिरसा मुंडा चौक येथे जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी परिसरातील अनेक आदिवासी बांधव एकत्र जमले. यावेळी भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून श्रीफळ वाढविण्यात आले आणि अभिवादन करण्यात आले.

यावेळी ॲड. अजय तुंबडा यांनी भगवान बिरसा मुंडा यांच्या कार्याचा आढावा घेत आदिवासी समाजासाठी तसेच देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी दिलेल्या योगदानाची माहिती दिली. सामाजिक कार्यकर्ते निलेश कासट यांनी आपल्या मनोगतातून ब्रिटिश सरकार, जमिनदार आणि सावकारांकडून आदिवासींच्या जल, जंगल आणि जमिनीवर कब्जा मिळविण्याचे प्रयत्न होत असताना आदिवासी समाजाची होणारी पिळवणूक रोखण्यासाठी बिरसा मुंडा यांनी उलगुलान चळवळीच्या माध्यमातून संघर्ष उभा केला, असे सांगितले. आदिवासी समाजाला आपले हक्क आणि अधिकार मिळवून देण्यासाठी त्यांनी केलेला संघर्ष आजच्या पिढीसाठीही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमाला आदिवासी एकता सेवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश पाडवी, पारंपरिक भगत विकू घाटाळ, शांताराम घाटाळ, पेसा अध्यक्ष संतोष कोरडा, पोलीस पाटील मोरेश्वर सातवी, वनहक्क समिती अध्यक्ष रामा गोवारी, कासा बांधकाम समिती अध्यक्ष अजय तुंबडा, ग्रामस्थ मंगेश वेडगा, राहुल भोये, आदिनाथ वावरे, व्यापारी वर्गातील ईश्वर पाटील, शैलेश वाघ, रवी वानखेडे आदी मान्यवर व नागरिक उपस्थित होते.



घारपुरे यांच्या निवासस्थानीही भगवान बिरसा मुंडा जयंती साजरी करण्यात आली. यावेळी ॲड. आशिष चव्हाण यांनी कार्यक्रमाची प्रास्ताविक भूमिका मांडताना बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजासाठी केलेले कार्य आणि देशाप्रती दिलेले योगदान विशद केले.उद्योजक शैलेश घारपुरे यांनी आपल्या मनोगतात भगवान बिरसा मुंडा हे आदिवासी समाजाचे आद्य क्रांतिकारक असून त्यांनी ब्रिटिश सत्तेविरोधात अत्यंत कमी वयात मोठा संघर्ष उभारला, असे सांगितले. त्यांचे विचार आणि कार्य आजच्या नव्या पिढीसाठी प्रेरणादायी आहेत. मातृभूमीसाठी केलेला त्यांचा संघर्ष विसरून चालणार नाही. त्यांच्या विचारांचा वारसा नव्या पिढीने पुढे नेणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. माजी गटशिक्षणाधिकारी रावते सर यांनी भगवान बिरसा मुंडा यांच्या संघर्षमय जीवनाची यशोगाथा सांगितली. अवघ्या २५ वर्षांच्या आयुष्यात त्यांनी आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी आणि देशासाठी मोठा त्याग केला. त्यामुळे दीडशे वर्षांनंतरही त्यांचे विचार समाजाला प्रेरणा देत आहेत. त्यांच्या स्मृती जतन करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून आदिवासी जनजाती गौरव सप्ताह साजरा केला जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

खाणीवमध्ये पारंपरिक संस्कृती जपणाऱ्यांचा सन्मान...

दुसरीकडे, खाणीव गावात भगवान बिरसा मुंडा जयंतीनिमित्त पेसा गावातील नागरिक एकत्र येत जिल्हा परिषद परिसरात जयंती उत्सव साजरा केला. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे आदिवासी समाजाची पारंपरिक संस्कृती, लोककला आणि रूढी-परंपरा जतन करण्यासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींचा विशेष सन्मान करण्यात आला. यामध्ये तारपा वादक, धुमाशा वादक, धवलेरीन, सोयीन, सवाशीन, गावदेव करणारे भगत, दिवसकार्य करणारे भगत तसेच आशा स्वयंसेविकांचा शाल, श्रीफळ आणि लुगडा देऊन गौरव करण्यात आला. पारंपरिक लोककलावंतांच्या सन्मानामुळे उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी तारपा नृत्य आणि धुमाशा नृत्याच्या तालावर उपस्थितांनी ठेका धरला. विशेष आकर्षण ठरलेल्या टिपरी नृत्य पथकाने सुंदर नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. संपूर्ण परिसर पारंपरिक वाद्यांच्या निनादाने आणि आदिवासी लोककलेच्या रंगात रंगून गेला होता.

यावेळी विलास बेलकर यांनी तारपा या आदिवासी समाजातील प्रतिष्ठित पारंपरिक वाद्याची माहिती दिली. तारपा वाद्य कधी, कुठे आणि कशा पद्धतीने वाजविले जाते, ते कोणत्या नैसर्गिक साधनांपासून तयार केले जाते, याचे प्रात्यक्षिकासह विवेचन केले. निसर्गातील पारंपरिक वस्तूंचा वापर करून तयार होणाऱ्या या वाद्याला आदिवासी संस्कृतीत विशेष महत्त्व आणि सन्मान असल्याचे त्यांनी सांगितले.

सामाजिक कार्यकर्ते निलेश कासट यांनी आदिवासी समाजाच्या पारंपरिक संस्कृती, चालीरीती आणि जीवनपद्धतीचे महत्त्व विशद केले. ॲड. अजय तुंबडा यांनी भगवान बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी केलेल्या ऐतिहासिक योगदानाची माहिती दिली.

माजी शिक्षणाधिकारी रावते सर यांनी आदिवासी समाजातील सांस्कृतिक बदल, परंपरांचे जतन आणि धर्मांतराच्या विषयावर आपले विचार मांडले. आदिवासी समाजाने आपल्या मूळ संस्कृतीचे आणि परंपरांचे महत्त्व ओळखून त्या पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी महालक्ष्मी ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच पूजा सातवी यांनीही भगवान बिरसा मुंडा जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या. सरपंच नितेश भोईर, ग्रामविकास अधिकारी सचिन महाला, पेसा अध्यक्ष सीताराम ठाकरे, अश्विनी भोईर, विनोद भोईर, दिनेश कोरडा यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

अशा प्रकारे कासा आणि खाणीव परिसरात साजऱ्या झालेल्या भगवान बिरसा मुंडा जयंती उत्सवातून केवळ क्रांतिकारकाच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले नाही, तर आदिवासी समाजाची अस्मिता, पारंपरिक कला, संस्कृती आणि हक्कांच्या लढ्याचा वारसाही अधोरेखित करण्यात आला. नव्या पिढीने आपल्या इतिहासाची ओळख ठेवून जल, जंगल, जमीन आणि संस्कृतीच्या संरक्षणासाठी जागरूक राहावे, असा संदेश या उत्सवातून देण्यात आला.

पनवेलमध्ये मद्यविक्रीला परवाना, पण सार्वजनिक त्रासाला कोणाची परवानगी?

अक्षराज : अभिनव येलवे

दि.१६, पनवेल : पनवेल महानगरपालिका हद्दीतील विविध भागांमध्ये असलेल्या वाईन शॉप आणि बिअर शॉपसमोरील मद्यपींच्या वाढत्या उपद्रवामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. मद्य खरेदी करण्यासाठी येणारे अनेक जण दुकानासमोर किंवा दुकानाच्या आजूबाजूच्या परिसरातच उघडपणे मद्यप्राशन करत असल्याचे चित्र अनेक ठिकाणी पाहायला मिळत आहे. विशेषतः सायंकाळच्या वेळेत या दुकानांच्या परिसरात मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून, रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांना या गर्दीतून मार्ग काढताना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. वाईन शॉप आणि बिअर शॉपमधून मद्य खरेदी केल्यानंतर काही ग्राहक सार्वजनिक ठिकाणीच मद्यप्राशन करण्यासाठी थांबतात. त्यामुळे दुकानांच्या आसपासच्या रस्त्यांवर आणि पदपथांवर गर्दी निर्माण होते. काही ठिकाणी मद्यप्राशन करणाऱ्यांकडून मोठमोठ्याने बोलणे, आरडाओरड करणे, असभ्य वर्तन करणे तसेच रस्त्यावरच गोंधळ घालण्याचे प्रकार घडत असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे.

या परिस्थितीचा सर्वाधिक त्रास महिला, शाळकरी मुले, मुली आणि ज्येष्ठ नागरिकांना सहन करावा लागत आहे. कामावरून घरी परतणाऱ्या महिला, शाळा-महाविद्यालयातून घरी जाणारी मुले तसेच परिसरातील रहिवाशांना अशा गर्दीतून जाताना अनेकदा संकोच आणि असुरक्षितता जाणवते. सार्वजनिक रस्ते हे सर्व नागरिकांसाठी असून, त्यावरून मोकळेपणाने आणि सुरक्षितपणे वावरण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. मात्र, काही मद्यपींच्या वर्तनामुळे सामान्य नागरिकांच्या या अधिकारावरच गदा येत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

विशेष म्हणजे, संबंधित परिसरात मद्यविक्रीची दुकाने सुरू असताना दुकानांच्या बाहेरील परिसरात काय घडत आहे, यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी कोणाची, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. शासनाने मद्यविक्रीसाठी



परवाने दिले असले तरी सार्वजनिक ठिकाणी मद्यप्राशन करणे किंवा इतरांना त्रास होईल असे वर्तन करण्याची मुभा दिलेली नाही. असे असतानाही संबंधित विभाग आणि पोलीस प्रशासनाकडून पुरेशी कारवाई होत नसल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

मद्यपींच्या या वाढत्या उपद्रवामुळे काही भागांतील सामाजिक वातावरणही बिघडत आहे. दुकानांच्या आसपास निर्माण होणारी गर्दी, रस्त्यांवरील अडथळे आणि नागरिकांना सहन करावा लागणारा मानसिक त्रास याकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. केवळ मद्यविक्रीच्या परवान्यापुरती जबाबदारी मर्यादित न ठेवता, संबंधित दुकानांच्या परिसरात कायदा व सुव्यवस्था राखली जाते की नाही, याची नियमित तपासणी होणे आवश्यक आहे.

त्यामुळे पनवेल महानगरपालिका, राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे या समस्येकडे लक्ष देऊन वाईन शॉप व बिअर शॉपच्या परिसरात नियमित गस्त वाढवावी, सार्वजनिक ठिकाणी मद्यप्राशन करणाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई करावी आणि दुकानांच्या बाहेरील परिसरात अनधिकृतपणे मद्यप्राशन करण्यास आळा घालावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.मद्य विक्रीतून महसूल मिळत असला तरी त्याची किंमत सर्वसामान्य नागरिकांनी आपल्या सुरक्षिततेच्या आणि शांततेच्या रूपाने का मोजावी? तळीरामांची मजा सुरू असताना महिला, मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना मात्र त्रासाची सजा भोगावी लागत असेल, तर प्रशासनाने आता तरी जागे होण्याची गरज आहे.

श्री विठ्ठल नामदेव महाराज मंदिर प्रवेशद्वाराचा लोकार्पण सोहळा संपन्न

ह.भ.प. भारत महाराज जाधव यांच्या हस्ते व आ.ओगले यांच्या प्रमुख उपस्थितीत दिमाखदार सोहळा

अक्षराज : सुनील क्षिरसागर

दि.१६, विंचूर (नाशिक) : श्रीरामपूर तालुक्याचे लोकप्रिय आमदार माननीय हेमंत ओगले यांच्या विकास निधीतून साकारण्यात आलेल्या 'श्री विठ्ठल नाम देव महाराज मंदिर प्रवेशद्वाराचा'लोकार्पण सोहळा अत्यंत उत्साहात, भक्तिमय आणि मंगलमय वातावरणात पार पडला. श्री संत रामदास महाराज कैकाडी मठाचे मठाधिपती तथा श्री क्षेत्र पंढरपूर येथील ह.भ.प. भारत महाराज जाधव यांच्या शुभहस्ते फित कापून व फटाक्यांच्या जोरदार आतिषबाजीमध्ये या प्रवेशद्वाराचे लोकार्पण करण्यात आले.

मान्यवरांचा सत्कार व उपस्थितांची गर्दी

नामदेव शिंपी समाज पंच मंडळाचे अध्यक्ष कैलास खंदारे यांच्या हस्ते ह.भ.प. भारत महाराज जाधव, आम दार माननीय हेमंत ओगले, नगराध्यक्ष करणदादा ससाणे तसेच उपस्थित इतर प्रमुख मान्यवरांचा यथोचित सत्कार करण्यात आला. दीपावलीच्या उत्तरार्धात आनंददायी ठरलेल्या या क्षणाचा अनुभव घेण्यासाठी शेकडो भाविक, वारकरी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संत नामदेव महाराजांच्या विचारांचे प्रबोधन

या प्रसंगी बोलताना प्रमुख अतिथी ह.भ.प. भारत महाराज जाधव यांनी आपल्या अमृतवाणीतून संत नामदेव महाराजांचे विचार साध्या, सरळ व सोप्या भाषेत उपस्थित भाविकांना सम जावून सांगितले. देणाऱ्याचे हात हजारो, दुबळी माझी झोळीया संत विचारांची महती त्यांनी उपस्थितांना पटवून देत उपस्थितांची मने जिंकली.

संविधान दिनानिमित्त रायगडावर उपस्थित राहण्याचे आवाहन

कार्यक्रमादरम्यान महत्त्वाचे आवाहन करताना भारत महाराज जाधव म्हणाले की, शिवशंभू प्रतिष्ठानच्या वतीने आगामी २५ व २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिनानिमित्त रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज व महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात येणार आहे. वारकरी, शेतकरी, आदिवासी आणि सर्व समाजबांधवांनी या ऐतिहासिक अभिवादन सोहळ्यासाठी रायगडावर मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी केले.



प्रमुख मान्यवरांची उपस्थिती

या लोकार्पण सोहळ्याला आमदार हेमंत ओगले, नगराध्यक्ष करणदादा ससाणे, शिर्डी संस्थांचे विश्वस्त तथा काँग्रेस कमिटीचे सचिन गुजर, नगरसेविका निलोफर शेख, नगरसेवक दिलीप नागरे, सामाजिक कार्यकर्ते लकी सेठी, अण्णासाहेब डावखर, विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे जिल्हाध्यक्ष अशोकराव दिवे, राज्यसचिव डॉ. जालिंदर घिगे, राज्य कार्यकारिणी सदस्य डॉ. सलीम शेख, शाहीर भीमराव कदम, ॲड. अमोल सोनवणे, ॲड. कुमार भिंगारे, संतोष त्रिभुवन, विजय जगताप, रामदास आढाव, भारत शिंगारे, भगवान खरात, सतीश लोंढे, इकबाल काकर, कवी रज्जाकभाई शेख, राजू शेख उपस्थित होते. तसेच शिंपी समाजाचे ज्येष्ठ मार्गदर्शक नामदेव भिसे, संगमनेर शिंपी समाज अध्यक्ष राजाभाऊ अवसक, राजु लचके, सचिन सारंगधर, किरण भांबरे, हेमंत सारंगधर, हेमंत गुजर, शाम सारंगधर, राहुल नेवासकर, तुषार नेवासकर, श्रीधर गायकवाड, राजू भांबरे, वासुदेव भांबरे, दत्तात्रय भांबरे, तेजस गायकवाड, म कुंदराव देव्हारे, गोविंद देव्हारे आदी सम ाजबांधव उपस्थित होते. अध्यात्म महिला मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती सुमन काकू नेवासकर, भावना नेवासकर, राष्ट्रसेवा दलाच्या श्रीमती नम्रता पवार यांच्यासह मोठ्या संख्येने महिला भगिनींनीही या सोहळ्यात सहभाग घेतला.

थोडक्यात बातम्या

कुंडलवाडीत भगवान बिरसा मुंडा यांच्या स्मारकाचे भूमिपूजन सोहळा थाटात संपन्न

अक्षराज : दत्ता हमंद

दि.१६, कुंडलवाडी (नांदेड) : आदिवासी समाजाचे महानायक, थोर क्रांतिकारक भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमि त्त कुंडलवाडी शहरात त्यांच्या स्मारकाच्या भूमिपूजन सोहळ्याचे आयोजन दि.१५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता मुख्य बाजारपेठेत करण्यात आले. या सोहळ्याच्या माध्यमातून भगवान बिरसा मुंडा यांच्या महान कार्याला अभिवादन करण्यात आले.भगवान बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, स्वाभिम ानासाठी आणि अन्यायाविरुद्ध दिलेल्या लढ्याला भारतीय इतिहासात विशेष महत्त्व आहे. त्यांचे विचार, त्याग आणि संघर्ष नव्या पिढीला प्रेरणा देणारे आहेत. त्यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या भूमिपूजन सोहळ्याम ुळे कुंडलवाडी शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुंडलवाडी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा प्रेरणाताई गजानन कोटलावार होत्या, तर उद्घाटक म्हणून नांदेड जिल्हा दक्षिण भाजपचे सरचिटणीस तथा माजी जिल्हा परिषद सदस्य श्री. लक्ष्मणराव ठक्करवाड साहेब उपस्थित होते.



या सोहळ्याचे प्रास्ताविक सायरेड्डी ठक्कूरवार यांनी केले. कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन डॉ. नरेश बोधनकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ.प्रशांत सब्बनवार यांनी केले.यावेळी नगराध्यक्षा प्रेरणाताई गजानन कोटलावार यांनी या स्मारकाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल, असे प्रतिपादन केले. उद्घाटक लक्ष्मणराव ठक्करवाड यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. तसेच नगरसेवक राजेश्वर उत्तरवार, अमरनाथ कांबळे यांचीही मनोगते झाली.यावेळी सामाजिक बांधिलकी आणि सम ाजाविषयी तळमळ असलेले व्यक्तिमत्व नगरसेवक मारुती कोटलावार यांनी चुंगी नाका ते मुख्य बाजारपेठे दरम्यान उपस्थित मान्यवरांना मोठ्या थाटामाटात बँड लावून आणले. त्यामुळे संपूर्ण कार्यक्रमाला उत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले होते.या कार्यक्रम ाला विविध क्षेत्रांतील मान्यवर, नगरसेवक, नगरसेविका, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवनकार्याला उजाळा देत त्यांच्या विचारांचा प्रसार करण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात आला. या सोहळ्याचे नियोजन समस्त मन्नेरवारलू समाज बांधव, कुंडलवाडी, ता. बिलोली, जि. नांदेड यांच्या वतीने करण्यात आले होते. या ऐतिहासिक सोहळ्यास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

आदिवासी समाजाच्या विकासासाठी सहकार्य करणार - आ. सुधीर मुनगंटीवार

अक्षराज : वसंत वडस्कर

दि.१६, चंद्रपूर : आदिवासी सम ाजाच्या प्रगतीसाठी अर्थमंत्री व वनमंत्री म्हणून घेतलेले महत्वपूर्ण निर्णय, केलेले प्रयत्न आणि भविष्यातील विकासाचा संकल्प त्यांनी मांडला. आदिवासी समाजाच्या प्रगतीसाठी जेव्हा जेव्हा हाक द्याल, तेव्हा तेव्हा मी खंबीरपणे आपल्या पाठीशी उभा राहीन, अशी ठाम आ. सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

जल, जंगल आणि जमिनीवरील हक्कांसाठी ब्रिटिश सत्तेविरुद्ध एल्गार पुकारणारे, अवघ्या २५ वर्षांच्या आयुष्यात देशाच्या स्वातंत्र्यलढ्याला आणि आदिवासी समाजाच्या अस्मि तेला नवी दिशा देणारे धरती आबा, आदिवासी, जननायक, भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त आणि जनजातीय गौरव दिनानिमित्त चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आयोजित कार्यक्रमात आ. सुधीर मुनगंटीवार यांनी भगवान बिरसा मुंडा यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन केले. यावेळी आदिवासी बांधवांच्या पारंपरिक नृत्यात सहभागी होत त्यांनी समाजाच्या उन्नतीसाठी सदैव खंबीरपणे साथ देण्याची ग्वाही दिली.



यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, महापौर संगीता खांडेकर, भगवान बिरसा मुंडा स्मारक समितीचे अध्यक्ष अशोक तुमराम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.आ. मुनगंटीवार म्हणाले की, भगवान बिरसा मुंडा यांनी अवघ्या २५ वर्षांच्या आयुष्यात जल, जंगल आणि जमिनीच्या हक्कांसाठी ब्रिटिश सत्तेविरुद्ध ऐतिहासिक संघर्ष केला.त्यांचे विचार आजही आदिवासी समाजाला प्रेरणा देणारे आहेत. चंद्रपूरमध्ये त्यांच्या स्मारकाच्या उभारणीच्या संकल्पात सहभागी होता आले, हे आपले भाग्य असल्याचे त्यांनी सांगितले.

आदिवासी समाजाच्या विकासासाठी मंत्रीपदाच्या कार्यकाळात शबरी घरकुल योजनेचा शहरी भागात विस्तार, पेसा ग्रामपंचायतींना ५ टक्के थेट निधी, तेंदूपत्ता संकलकांना ७२ कोटींचा बोनस आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत असे महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याचे त्यांनी नमूद केले.

मिशन शौर्यच्या माध्यमातून आदिवासी युवकांनी एव्हरेस्ट सर केले असून, आता मिशन ऑलिम्पिक २०३६ अंतर्गत चंद्रपूरच्या आदिवासी खेळाडूने ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकावे, हे आपले स्वप्न असल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी वीर बाबुराव शेडम ाके यांच्या नावाने आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा संकुल उभारण्याचे प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

आदिवासी समाजाची प्रगती, विकास आणि सन्मान यासाठी कार्य करणे हे आपले कर्तव्य असून, सम ाजाच्या प्रत्येक सुख-दुःखात आणि अडचणीच्या काळात आपण खंबीरपणे पाठीशी उभे राहू, अशी ग्वाही आ. सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

निफाड तहसील कार्यालयातील अभिलेख शाखेचे कामकाज तात्पुरते बंद; रेकॉर्ड स्थलांतराचे काम सुरू

अक्षराज : सुनील क्षिरसागर

दि.१६,विंचूर (नाशिक) : निफाड तहसील कार्यालयातील अभिलेख शाखेचे संपूर्ण रेकॉर्ड नवीन तहसील कार्यालयात स्थलांतरित करण्याचे म हत्त्वपूर्ण काम सोमवार, १६ नोव्हेंबर पासून हाती घेण्यात आले आहे. या रेकॉर्ड स्थलांतराच्या प्रक्रियेमुळे अभिलेख शाखेअंतर्गत दिल्या जाणाऱ्या 'नकला' काढण्याचे कामकाज तात्पुरत्या स्वरूपात बंद ठेवण्यात आले आहे.पुढील आदेश किंवा सूचना मिळेपर्यंत नागरिकांना सातबारा उतारा, फेरफार आणि इतर शासकीय अभिलेखांच्या प्रमाणित प्रती मिळणार नाहीत, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.



मुख्य मुद्दे :- कामकाज बंद : रेकॉर्ड स्थलांतराचे काम पूर्ण होईपर्यंत नकला मिळण्याची प्रक्रिया स्थगित.

कधीपर्यंत?: जोपर्यंत संपूर्ण रेकॉर्ड नवीन इमारतीत व्यवस्थित स्थलांतरित होत नाही, तोपर्यंत हे काम बंद राहील. सेवा पूर्ववत सुरू झाल्यावर याची स्वतंत्र माहिती दिली जाईल.

तहसीलदारांचे नागरिकांना आवाहन : शेतकरी बांधव व नागरिकांनी नकला मिळविण्यासाठी सध्या विनाकारण तहसील कार्यालयात येणे टाळावे आणि रेकॉर्ड स्थलांतराच्या या कामात प्रशासनाला पूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी केले आहे.

स्वतंत्र शेतकरी आयोगाच्या स्थापनेसाठी आ. मुनगंटीवार यांची मुख्यमंत्र्याकडे मागणी

अक्षराज : वसंत वडस्कर

दि.१६, चंद्रपूर : महाराष्ट्राच्या कृषी व्यवस्थेचा कणा असलेल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे आता केवळ स्वतंत्र योजनांच्या किंवा तात्कालिक उपाययोजनांच्या चौकटीतून न पाहता, एका सक्षम आणि स्वायत्त यंत्रणेच्या माध्यमातून सर्वंकष दृष्टिकोनातून पाहिले जावे, या व्यापक भूमिकेतून माजी अर्थमंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी राज्याच्या कृषी धोरणासमोर एक महत्त्वपूर्ण संकल्पना मांडली आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी केवळ अनुदान, कर्जमाफी किंवा नुकसानभरपाईपुरत्या मर्यादित नसून, त्यामागे प्रशासकीय दिरंगाई, योजनांच्या अंमलबजावणीतील त्रुटी, बाजारपेठेतील अनिश्चितता आणि न्याय मिळविण्यासाठी करावी लागणारी परवड अशा अनेक प्रश्नांचे गुंतागुंतीचे वास्तव आहे. या सर्व प्रश्नांचा एकत्रित विचार करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी महाराष्ट्रात स्वतंत्र, स्वायत्त व अधिकारसंपन्न 'महाराष्ट्र राज्य शेतकरी आयोग' स्थापन करण्यात यावा, अशी आग्रही मागणी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे केली असून, यासंदर्भात त्यांनी सविस्तर निवेदन सादर केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या आर्थिक पाहणी अहवाल २०२४-२५ नुसार, कृषी गणना २०२१-२२ च्या तात्पुरत्या आकडेवारीप्रमाणे राज्यात एकूण १ कोटी ७१ लाख ११ हजार कार्यरत कृषी धारणांची नोंद असून त्यांचे एकूण क्षेत्र सुमारे २१०.७९ लाख हेक्टर आहे. ही आकडेवारी राज्यातील कृषी व्यवस्थेचा व्यापक आवाका अधोरेखित करते. एवढ्या मोठ्या कृषी क्षेत्राशी निगडित शेतकऱ्यांना कर्जबाजारीपणा, पीकविमा, नैसर्गिक आपत्ती, नुकसानभरपाई, सिंचन, वीजपुरवठा, वाढता उत्पादन खर्च, शेतमालाचे बाजारभाव, कृषी निविष्ठा आणि विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीतील अडचणींचा साम ना करावा लागतो.

या समस्यांचे स्वरूप परस्परांशी जोडलेले असल्याने त्यावर विभागवार तोडगा काढण्याऐवजी सर्वसमावेशक आणि समन्वयात्मक यंत्रणा उभी करणे आवश्यक असल्याचे आ. मुनगंटीवार यांनी निवेदनात अधोरेखित केले आहे.

शेतकरी हा कोणत्याही एका जातीचा, धर्माचा किंवा पंथाचा नसतो. तो एक स्वतंत्र सामाजिक आणि आर्थिक घटक आहे. विविध समाजघटकांतील नागरिक शेती व्यवसायाशी जोडलेले असून त्यांच्या सामाजिक ओळखी वेगवेगळ्या असल्या तरी शेती करताना भेडसावणारे प्रश्न बहुतांश वेळा समान असतात. त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे जात, धर्म आणि राजकीय विचारसरणीच्या पलीकडे जाऊन पाहण्याची आवश्यकता असल्याचे आ. मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले आहे. राज्यातील विविध सामाजिक घटकांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांच्या विकासासाठी स्वतंत्र आयोग कार्यरत असताना, कृषी क्षेत्राचा कणा असलेल्या शेतकऱ्यांसाठीही स्वतंत्र आयोग असणे आवश्यक असल्याची भूमिका आ.मुनगंटीवार यांनी मांडली आहे.

*** शेतकरी प्रश्नांचा वेध; आयोगाची व्यापक कार्यकक्षा**

प्रस्तावित आयोगाने शेतकऱ्यांच्या सामाजिक, आर्थिक व कृषिविषयक समस्यांचा अभ्यास करून शासनाला उपाययोजना सुचवाव्यात. कर्जमाफी, पीककर्ज, पीकविमा, नुकसानभरपाई, नैसर्गिक आपत्तीतील मदत, शेतमालाचे बाजारभाव आणि उत्पादन खर्च यांसारख्या महत्त्वपूर्ण प्रश्नांची दखल आयोगाने घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.तसेच विविध शासकीय विभागांम ध्ये समन्वय साधून शेतकऱ्यांच्या तक्रारींचे निराकरण करणे, सिंचन, वीजपुरवठा, आधुनिक तंत्रज्ञान व कृषी प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देणे, तसेच शेतकरी आत्म हत्या रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना सुचविणे या जबाबदाऱ्यांचा समावेश असावा. महिला, अल्पभूधारक व आदिवासी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देतानाच शेतकरी संघटना आणि प्रत्यक्ष शेतकऱ्यांना आपल्या समस्या थेट मांडण्यासाठी स्वतंत्र व्यासपीठ उपलब्ध करून द्यावे, अशी अपेक्षा आ.मुनगंटीवार यांनी व्यक्त केली आहे.

*** उत्तरदायी आणि अधिकारसंपन्न आयोगाची म ागणी**

प्रस्तावित आयोग केवळ शिफारशी करणारा न राहता शेतकऱ्यांच्या तक्रारींची दखल घेऊन संबंधित विभागांकडून माहिती मागविणे व प्रश्नांच्या निराकरणासाठी प्रभावी पाठपुरावा करणारा असावा, असा आ. मुनगंटीवार यांचा आग्रह आहे. आयोगाच्या शिफारशींवर ९० दिवसांत निर्णय घेणे, त्या अमान्य केल्यास कारणे लेखी कळविणे आणि आयोगाचा वार्षिक अहवाल विधानमंडळासमोर सादर करणे बंधनकारक असावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. आयोगाला स्वतंत्र अध्यक्ष, सदस्य, अर्थसंकल्प, प्रशासकीय यंत्रणा आणि चौकशी व माहिती मागविण्याचे कायदेशीर अधिकार देण्यात यावेत. प्रत्येक विभागात तक्रार निवारण यंत्रणा उभारण्यासह आयोगात अनुभवी शेतकरी प्रतिनिधी, कृषी तज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ, विद्यापीठांचे प्रतिनिधी, महिला शेतकरी आणि सहकार व पणन क्षेत्रातील जाणकारांचा सम ावेश असावा, असेही निवेदनात सुचविण्यात आले आहे.

*** स्वतंत्र कायद्याद्वारे आयोगाच्या स्थापनेची मागणी**

महाराष्ट्रातील १ कोटी ७१ लाखांहून अधिक कृषी धारणांशी संबंधित शेतकरी कुटुंबांच्या प्रश्नांसाठी सर्व विभागांमध्ये समन्वय साधणारी आणि शेतकऱ्यांना थेट शासनापर्यंत आपले म्हणणे मांडता येईल, अशी स्वतंत्र यंत्रणा आवश्यक असल्याचे आ. सुधीर मुनगंटीवार यांनी नमूद केले आहे.त्यामुळे स्वतंत्र, स्वायत्त व सक्षम 'महाराष्ट्र राज्य शेतकरी आयोग' स्थापन करून त्याला कायदेशीर अधिष्ठान देण्यासाठी स्वतंत्र कायदा करावा, तसेच आयोगाच्या स्थापनेसाठी आवश्यक प्रशासकीय व आर्थिक तरतुदी करण्याचे निर्देश द्यावेत, अशी विनंती आ.मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे केली आहे.

मुंब्र्यात सागर स्वीट्समधील मिठाई खाल्ल्यानंतर व्यक्तीचा मृत्यू



अक्षराज : विनोद वास्कर

दि.१६, मुंब्रा : मुंब्र्यातील सागर स्वीट्समधील मिठाई खाल्ल्यानंतर एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत असून, या घटनेचा आणि मिठाईचा परस्पर संबंध आहे का, याबाबत FDA कडून तपास केला जात आहे. या प्रकरणाच्या तपासासाठी FDA अधिकारी प्रियांका विशे मुंब्र्यात आल्या होत्या. यावेळी त्यांनी दुकानाची पाहणी करून संबंधित माहिती घेतली. यावेळी हिंदी भाषिक पत्रकारांनी हिंदीत प्रश्न विचारल्यानंतर त्यांनी हिंदीत उत्तरे दिली. मात्र, डिजिटल महाराष्ट्रच्या मराठी पत्रकारांनी मराठीत माहिती देण्याची विनंती केली असता त्यांनी नकार दिल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे मराठी पत्रकारांना मराठीत उत्तर देण्यास नकार का? FDA अधिकारी प्रियांका विशे यांची मराठी भाषेबाबत नेमकी भूमिका काय? महाराष्ट्रात नेमकं चाललंय तरी काय? अशी चर्चा आता सुरू झाली आहे. महाराष्ट्रात मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा असताना, सरकारी अधिकाऱ्याने मराठी पत्रकारांना मराठीत माहिती देण्यास नकार देणे कितपत योग्य आहे, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

या प्रकरणात मिठाईमुळे मृत्यू झाला की अन्य कारण आहे, हे तपासानंतरच स्पष्ट होणार आहे. FDA च्या अहवालाकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.